# विद्यापीठात जिजाऊ, विवेकानंदांना अभिवादन

शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी आदी उपस्थित होते.

# पंडित आवळीकर काव्य पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रदान करण्यात येणारे पंडित आवळीकर काव्य पुरस्कार जाहीर करण्यात आले. कवी गणेश आत्माराम वसईकर, दिनकर मनवर, सुप्रिया आवारे आणि नामदेव कोळी यांच्या काव्यसंग्रहांना हे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने या पुरस्कारांचे वितरण २८ जानेवारी रोजी ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ही माहिती मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाने मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी मराठी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, समीक्षक पंडित आवळीकर यांच्या नावे 'पंडित आवळीकर काव्य पुरस्कार' देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार आवळीकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमधून हे पुरस्कार दोन वर्षांतून एकदा देण्यात येणार आहेत.

# मराठी भाषा संवर्धनासाठी सातत्य राखा

## डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात पंधरवड्याचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाने मराठी भाषा संवर्धनासाठी सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. यंदाही मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करताना त्यांनी अभिनव उपक्रम, कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यातील सातत्य कायम राखावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे केले.

विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने साजरा केल्या जाणाऱ्या 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा-२०२१'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. यंदा लेखक-संवाद या अभिनव उपक्रमातून डॉ. राजन गवस, अनिल मेहता, महादेव मोरे, मोहन पाटील, आदी दिग्गजांशी संवाद साधण्यात येणार आहे. या निमित्ताने नव्या-जुन्या लेखक प्रकाशकांचे हृद्गत श्रोत्यांसमोर उलगडले जाईल. त्यांच्या अभिव्यक्तीच्या प्रेरणा, जाणिवा यांची माहिती होईल. त्याचप्रमाणे 'स्मरण अरुण कोल्हटकरांचे...' या चर्चासत्रांतर्गत अरुण कोल्हटकरांचे साहित्य, व्यक्तिमत्त्व यांची विविधांगांनी माहिती लोकांसमोर येईल. अशा पद्धतीने वेळोवेळी विविध साहित्यिक, कवींच्या साहित्याच्या अनुषंगाने चर्चासत्रे आयोजित करण्याची गरज असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी डॉ. अक्षय सरवदे, अवनिश पाटील, मेघा पानसरे, गोविंद काजरेकर, उदयसिंह राजेयादव, आदी उपस्थित होते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.



कोल्हापुरात मराठी भाषा संवर्धन पंधरवडाच्या उद्घाटनप्रसंगी चित्रकार सुधीर गुरव यांचा सत्कार कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केला.

### साहित्यिकांचे कायमस्वरूपी चित्र प्रदर्शन

मराठी अधिविभागामध्ये स्थापित साहित्यिकांच्या कायमस्वरूपी चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. ही चित्रे रेखाटणारे चित्रकार सुधीर गुरव यांचा सत्कार करण्यात आला.

# मराठी भाषा संवर्धनाच्या उपक्रमात सातत्य राखावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाने मराठी भाषा संवर्धनासाठी सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. यंदा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करताना अभिनव उपक्रम, कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यातील सातत्य कायम राखावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उद्घाटन प्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

विद्यापीठ मराठी अधिविभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात येत असलेल्या 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा-२०२१'चे औपचारिक उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने यंदा लेखक-संवाद हा अभिनव उपक्रम घेण्यात येणार आहे. या निमित्ताने नव्या-जुन्या लेखक प्रकाशकांचे हृद्गत श्रोत्यांसमोर उलगडले जाईल.

सुरुवातीला कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते मराठी अधिविभागात साहित्यिकांच्या कायमस्वरूपी चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रास्ताविक मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. अक्षय सरवदे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, विदेशी भाषा प्रमुख डॉ. मेघा पानसरे, प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

### पंधरवड्यांतर्गत होणार कार्यक्रम..

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत १४ ते २८ जानेवारी या कालावधीत 'लेखकसंवाद' आयोजित केला आहे. डॉ. राजन गवस, अनिल मेहता, महादेव मोरे, मोहन पाटील, माया नारकर, कृष्णात खोत, किरण गुरव, नामदेव माळी, संपत मोरे यांच्याशी संवाद साधण्यात येणार आहे. १८ जानेवारी रोजी विष्णू पावले लिखित 'पधारो म्हारो देस' आणि डॉ. सयाजी गायकवाड यांच्या 'मराठी पोवाडा (तीन भाग)' या ग्रंथांचे प्रकाशन होईल. २० जानेवारी रोजी 'स्मरण अरुण कोलटकरांचे' या चर्चासत्रात प्रा. श्रीकृष्ण कालगावकर, प्रा. अरुण चव्हाण व प्रा. अविनाश सप्रे सहभागी होतील. २८ जानेवारी रोजी पंडित आवळीकर काव्य पुरस्कारांचे वितरण होईल.

### शिवाजी विद्यापीठातून...

# विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त विविध उपक्रम हाती घेण्यात आले असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्यातर्फे साजऱ्या होणाऱ्या 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा-२०२१'चे औपचारिक उद्‌घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत झाले. स्वागत व प्रास्ताविक मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

दरम्यान, सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अधिविभागामध्ये स्थापित साहित्यिकांच्या कायमस्वरूपी चित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. चित्रकार सुधीर गुरव यांनी ही चित्रे रेखाटली आहेत. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अक्षय सरवदे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, विदेशी भाषा प्रमुख डॉ. मेघा पानसरे, प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

**पंधरवड्यांतर्गत कार्यक्रम**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत दि. १४ ते २८ जानेवारी या कालावधीत 'लेखक संवाद' आयोजित केला आहे. त्यात डॉ. राजन गवस, अनिल मेहता, महादेव मोरे, मोहन पाटील, माया नारकर, कृष्णात खोत, किरण गुरव, नामदेव माळी, संपत मोरे यांच्याशी संवाद साधण्यात येणार आहे. १८ जानेवारी रोजी विष्णू पावले लिखित 'पधारो म्हारो देस' आणि डॉ. सयाजी गायकवाड यांच्या 'मराठी पोवाडा (तीन भाग)' या ग्रंथांचे डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत प्रकाशन होणार आहे. २० जानेवारी रोजी 'स्मरण अरुण कोलटकरांचे' या चर्चासत्रात प्रा. श्रीकृष्ण कालगावकर, प्रा. अरुण चव्हाण आणि प्रा. अविनाश सप्रे (अध्यक्ष) सहभागी होतील. २८ जानेवारी रोजी पंडित आवळीकर काव्य पुरस्कारांचे वितरण होईल. कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून हे कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने पाहण्यास उपलब्ध करण्यात येणार आहेत.

# वसईकर, मनवर, आवारे, कोळी यांना 'पंडित आवळीकर काव्य पुरस्कार'

## शिवाजी विद्यापीठाकडून घोषणा : २८ जानेवारीला वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कवी गणेश आत्माराम वसईकर, दिनकर मनवर, सुप्रिया आवारे आणि नामदेव कोळी यांच्या काव्यसंग्रहांना शिवाजी विद्यापीठाने पंडित आवळीकर काव्य पुरस्कार गुरुवारी जाहीर केले. रोख रक्कम, शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्र आणि शिवाजी विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



गणेश वसईकर



दिनकर मनवर



सुप्रिया आवारे



नामदेव कोळी

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने या पुरस्कारांचे वितरण दि. २८ जानेवारीला ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे, अशी माहिती मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

विद्यापीठाने मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी मराठी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, समीक्षक पंडित आवळीकर यांच्या नावे 'पंडित आवळीकर काव्य पुरस्कार' देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार आवळीकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमधून हा पुरस्कार दोन वर्षातून एकदा देण्यात येणार आहे.

सन २०१४ ते २०२० या कालावधीतील एकूण चार काव्यसंग्रहांना एकाचवेळी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सन २०१४-१५साठी गणेश वसईकर यांच्या 'मधल्या मध्ये' या काव्यसंग्रहास, सन २०१६-१७ साठी दिनकर मनवर यांच्या 'अजूनही बरंच काही', सन २०१८-१९साठी सुप्रिया आवारे यांच्या 'न बांधल्या जाणाऱ्या घरात' आणि सन २०२०साठी नामदेव कोळी यांच्या 'काळोखाच्या कविता' या कवितासंग्रहांना पुरस्कार जाहीर केला आहे.

या पुरस्कारासाठी परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, प्रा. नंदकुमार मोरे यांनी काम पाहिले.



गणेश वसईकर



दिनकर मनवर



सुप्रिया आवारे



नामदेव कोळी

# वसईकर, मनवर, आवारे, कोळी यांच्या काव्यसंग्रहांना पं. आवळीकर काव्य पुरस्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रदान करण्यात येणारे पंडित आवळीकर काव्य पुरस्कार कवी गणेश वसईकर, दिनकर मनवर, सुप्रिया आवारे व नामदेव कोळी यांच्या काव्यसंग्रहांना गुरुवारी जाहीर करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने पुरस्कारांचे वितरण दि. २८ रोजी ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. रोख रक्कम, शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. विद्यापीठाने मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी मराठी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, समीक्षक पंडित आवळीकर यांच्या नावे 'पंडित आवळीकर काव्य पुरस्कार' देण्याचे निश्चित केले आहे. आवळीकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमधून हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, प्रा. नंदकुमार मोरे यांनी काम पाहिले.